खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२१ – २२

### राज्यशास्त्र विभाग : संविधान दिन गौरव कार्यक्रम

पुढारी

# भारतीय संविधान जगाला मार्गदर्शक

## ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांचे प्रतिपादन

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

वैश्विक स्तरावर भारतीय संविधानाचे संवैधानिक महत्त्व सिद्ध झाले असून त्यातील मूल्ये संपूर्ण जगाला मार्गदर्शक असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित संविधान दिन गौरव कार्यक्रमात बोलत होते.

याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, डॉ. कैलास सोनवणे, तसेच वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी बोलताना लोकशाहीचे महान तत्त्वचिंतक असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. भारतीय संविधान म्हणजे केवळ शब्द नसून प्रत्येक व्यक्तीला केंद्रस्थानी मानून स्वातंत्र्य आणि समतेची कास धरणारा एक जिवंत दस्तऐवज आहे. यातील स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, धर्मनिरपेक्षता आणि न्याय ही संवैधानिक मूल्य आत्मसात करून प्रत्येकाने आपल्या जीवनशैलीला आकार देण्याची गरज आहे. संविधानाचा अभ्यास फक्त विद्यार्थ्यांनी नव्हे तर समाजातील सर्व सुजाण नागरिकांनी करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

यावेळी संविधानातील उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पोलिस आणि नागरिकांना याप्रसंगी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रास्ताविक डॉ. कैलास सोनवणे यांनी केले, सूत्रसंचालन रोशन पानमंद यांनी केले, तर आभार डॉ. प्रभाकर जगताप यांनी मानले.

My Gramin Edition
Nov 28, 2021 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

सकाळ

# लोकशाही राष्ट्रासाठी संविधान दिशादर्शक

## बुट्टे पाटील यांचे प्रतिपादन; राजगुरुनगरला उद्देशिका वाचन

राजगुरुनगर, ता. ३० : भारतीय संविधान हा लोकशाहीचा आदर्श दस्तावेज असून, जगातील सर्व लोकशाही राष्ट्रांना प्रेरक व दिशादर्शक आहे, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित संविधान दिन गौरव कार्यक्रमात बोलत होते.

महाविद्यालयात संविधानातील उद्देशिकेचे सामूहिक वाचन व वाटप करण्यात आले. तसेच २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

बुट्टे पाटील म्हणाले, "भारतीय संविधान म्हणजे फक्त छापील शब्द नसून, प्रत्येक व्यक्तीला केंद्रस्थानी मानून स्वातंत्र्य आणि समतेची महत्ता सांगणारा एक जिवंत दस्तावेज आहे."

याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, डॉ. कैलास सोनवणे आदी उपस्थित होते.



राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करताना मान्यवर.

Pune, District-Today
01/12/2021 Page No. 5

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

**गांवकरी**

■ वर्ष ८३ ■ अंक : ८७ ■ नाशिक, शनिवार, दि. २७ नोव्हेबर २०२१ ■ किंमत रु. ४.०० ■ पाने = ८ ■ नाशिक ■ नगर-पुणे-ठाणे-पालघर

# भारतीय संविधान जगाला मार्गदर्शक : ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील

राजगुरूनगर
गांवकरी प्रतिनिधी



वैश्विक स्तरावर भारतीय संविधानाचे संविधानिक महत्त्व सिद्ध झाले असून त्यातील मूल्ये संपूर्ण जगाला मार्गदर्शक असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित संविधान दिन गौरव कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा.एस.एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, डॉ. कैलास सोनवणे तसेच वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी बोलताना लोकशाहीचे महान तत्त्वचिंतक असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. भारतीय संविधान म्हणजे केवळ शब्द नसून प्रत्येक व्यक्तीला केंद्रस्थानी मानून स्वातंत्र्य आणि समतेची कास धरणारा एक जिवंत दस्ताऐवज आहे.

यातील स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, धर्मनिरपेक्षता आणि न्याय ही संविधानिक मूल्य आत्मसात करून प्रत्येकाने आपापल्या जीवनशैलीला आकार देण्याची गरज आहे. संविधानाचा अभ्यास फक्त विद्यार्थ्यांनी नव्हे तर समाजातील सर्व सुजाण नागरिकांनी करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

भारत हे विविधतेने नटलेले संपन्न राष्ट्र असून संविधानातील भारत साकारण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.यावेळी संविधानातील उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पोलीस आणि नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रास्ताविक डॉ. कैलास सोनवणे यांनी, सूत्रसंचालन रोशन पानमंद यांनी केले. आणि आभार डॉ. प्रभाकर जगताप यांनी मानले.

पुणे आवृत्ती बातम्यांचा राजा
जनप्रवास
मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, अहमदनगर येथून एकाच वेळी प्रसिध्द
RNI No. MAHMAR/2013/57
• शनिवार, दि. २७ नोव्हेंबर २०२१ • वर्ष : ९ • अंक : ६८ • पाने ८ • किंमत २ रुपये ww

# भारतीय संविधान जगाला मार्गदर्शक : ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील



राजगुरूनगर
जनप्रवास प्रतिनिधी

वैश्विक स्तरावर भारतीय संविधानाचे संविधानिक महत्त्व सिद्ध झाले असून त्यातील मूल्ये संपूर्ण जगाला मार्गदर्शक असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित संविधान दिन गौरव कार्यक्रमात बोलत होते.

याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा.एस.एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, डॉ. कैलास सोनवणे तसेच वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी बोलताना लोकशाहीचे महान तत्त्वचिंतक असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. भारतीय संविधान म्हणजे केवळ शब्द नसून प्रत्येक व्यक्तीला केंद्रस्थानी मानून स्वातंत्र्य आणि समतेची कास धरणारा एक जिवंत दस्ताऐवज आहे. यातील स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, धर्मनिरपेक्षता आणि न्याय ही संविधानिक मूल्य आत्मसात करून प्रत्येकाने आपापल्या जीवनशैलीला आकार देण्याची गरज आहे. संविधानाचा अभ्यास फक्त विद्यार्थ्यांनी नव्हे तर समाजातील सर्व सुजाण नागरिकांनी करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. भारत हे विविधतेने नटलेले संपन्न राष्ट्र असून संविधानातील भारत साकारण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी संविधानातील उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

तसेच २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पोलीस आणि नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

प्रास्ताविक डॉ. कैलास सोनवणे यांनी, सूत्रसंचालन रोशन पानमंद यांनी केले. आणि आभार डॉ. प्रभाकर जगताप यांनी मानले.

वर्ष : १४०
Regd.No. PCW/002/2018-2020-S.P.College Post-RNI No. 1755/57
केसरी
राष्ट्रीय ठेवा

# भारतीय संविधान जगाला मार्गदर्शक

## देवेंद्र बुट्टेपाटील यांचे प्रतिपादन



**राजगुरूनगर, (वार्ताहर) :** वैश्विक स्तरावर भारतीय संविधानाचे संविधानिक महत्त्व सिद्ध झाले असून त्यातील मूल्ये संपूर्ण जगाला मार्गदर्शक असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित संविधान दिन गौरव कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, डॉ. कैलास सोनवणे तसेच वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**